सत्यमेव जयते

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांचे कार्यालय.

**वनप्रशासकिय भवन, पोटेगांव रोड, गडचिरोली-442605 (महाराष्ट्र)**

दुरध्वनी क्रमांक 07132-233184 Email-ccfgad@gmail.com

क्रमांक :- कक्ष-3(1)/तेंदू/विक्री/ 4818 गडचिरोली, दिनांक 21/03/2025

प्रति,

उपवनसंरक्षक (प्रा.)
आलापल्ली/भामरागड/गडचिरोली/सिरोंचा/वडसा

विषय :- माहे एप्रिल/2025 करीता इमारती माल, जळाऊ बिटे व लांब बांबू वनोपजाचे ई-लिलावाचे आयोजन करणे बाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-3(1)/तेंदू/विक्री/ 917 दिनांक 20.06.2024

***

गडचिरोली व चंद्रपूर वनवृत्तातील वनोपजाचे लिलावाकरीता एकसुत्रता राहावी व दोनही वनवृत्तासाठी जास्तीत जास्त दिवस उपलब्ध व्हावेत या उद्देशाने मुख्य वनसंरक्षक, गडचिरोली वनवृत्त यांनी दिनांक 12.06.2024 रोजी व्ही.सी. द्वारे सभा घेवून गडचिरोली व चंद्रपूर वनवृत्ताकरीता लिलाव तारखा निश्चीत केलेल्या आहेत.

त्यानुसार गडचिरोली वनवृत्ताकरीता इतर किसम इमारती करीता दिनांक 1 ते 10 व 29 ते 30/31 व साग इमारती करीता दिनांक 11 ते 19 अशा तारखा मंजुर केलेल्या आहेत. मंजुर तारखानुसार माहे एप्रिल/2025 या महिण्यात इमारती मालाचे ई-लिलाव साठी दिनांक 6 व 13 रवीवार आणि दि. 10 महावीर जयंती, दि. 14 डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व दिनांक 18 गुड फ्रायडे असे शासकिय सुट्टीचे दिवस वगळुन खालीलप्रमाणे विभागनिहाय तारखा आवंटीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वनविभाग | इतर किसम इमारती | साग इमारती | जळाऊ बिटे / बांबू |
|---|---|---|---|---|
| 1 | वडसा | दिनांक 1 एप्रिल पुर्ण दिवस | दिनांक 15 एप्रिल सकाळी 9.00 ते 15.30 वा. पर्यंत | 2 |
| 2 | गडचिरोली | दिनांक 2 एप्रिल पुर्ण दिवस | दिनांक 15 एप्रिल दु. 15.30 ते 16.30 वा. पर्यंत | दिनांक 1 एप्रिल पुर्ण दिवस |
| 3 | आलापल्ली | दिनांक 3, 4 व 5 एप्रिल पुर्ण दिवस व दि. 29 चे 11.20 पासुन पुर्ण व दि. 30 पुर्ण दिवस | दिनांक 11 व 12 एप्रिल पुर्ण दिवस | दिनांक 3, 4 व 5 एप्रिल पुर्ण दिवस व दि. 29 व दि. 30 पुर्ण दिवस |
| 4 | सिरोंचा | दिनांक 7, 8 व 9 एप्रिल पुर्ण दिवस | दिनांक 16 व 17 एप्रिल पुर्ण दिवस | दिनांक 7, 8 व 9 एप्रिल पुर्ण दिवस |
| 5 | भामरागड | दिनांक 29 एप्रिल सकाळी 9.00 ते 11.20 वा. पर्यंत | | |

वरील तारखांनुसार आपले वनविभागातील इमारती माल वनोपजाचे ई-लिलावाचे आयोजन करतांना दिनांक 1 एप्रिल/2025 पासुन दररोज सकाळी 9.00 वा. ते सायंकाळी 6.55 वा. पर्यंत प्रति बॅच 6 लॉट याप्रमाणे प्रतिदिवस 1070 लॉटस् लिलावात ठेवावयाचे आहेत. तरी लिलाव नियमानुसार लिलाव तारखेच्या 8 दिवसापुर्वी लीलावाकरीता आवश्यक असलेली सर्व माहिती व फोटोग्राफ एनआयसी. समन्वयक, निर्देशन विभाग यांचेकडे सुपूर्द करावे. विहीत वेळेत सदरची माहिती प्राप्त न झाल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल याची नोंद / दक्षता घ्यावी. करीता माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

**(एस. रमेश कुमार)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**गडचिरोली.**

प्रतिलीपी :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
प्रतिलीपी :- एनआयसी. समन्वयक, निर्देशन विभाग, गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.